<u>**भूसंपादन निर्देशन अर्ज क्र. १५०/२०१६**</u>
<u>**निशाणी क्र. ०९ खालील आदेश**</u>

प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवाला क्र. १ ने रेफरेन्स विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली. पुरेशी संधी देवुनही अर्जदारातर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करण्यात आले नाही. परिणामी, अर्जदाराविरुध्द अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला.

०२. सामनेवालातर्फे सहा. सरकारी वकील श्री. योगेश तेंडुलकर यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. अर्जदारतर्फे अर्जात म्हणणे नसल्याने युक्तीवाद नाही.

०३. सामनेवाला क्र. १ चे कथन की, निवडणुक कामकाज, न्यायालयीन कामकाज, कोविड कालावधी तसेच दिल्ली–मुंबई कॉरिडोरचे संपादनाच्या कार्यावाही व्यस्ततेमुळे प्रस्तुत प्रकरणात हजर होवुन कैफियत दाखल करता आली नाही. दरम्यान सामनेवाला क्र.१ विरुध्द रेफरन्स अर्ज विना कैफियत चालविण्याचा आदेश पारित झाला. शासना तर्फे कैफियत दाखल न झाल्यास शासनाचे मोठया प्रमाणावर नुकसान होणार आहे. सबब, विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची व बचावाची संधी द्यावी अशी विनंती केली.

०४. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदारास पुरेशी संधी देवुनही प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करण्यात आले नाही. परिणामी, प्रस्तुत अर्ज विना आव्हानित आहे.

०५.      मुळ अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम १८ अन्वये भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाले व अर्जदार यांचे प्रस्तुत वादामध्ये आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याचे स्पष्ट होते. सामनेवाला क्र. १ ने मुदतीत कैफियत न देण्याबाबत अर्जात दिलेली कारणे संयुक्तीक दिसुन येते. मुळ अर्जाचे स्वरुप पाहता सामनेवाला क्र.१ ला बाजु मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. सामनेवाला क्र.१ विरुध्दचा विना कैफियत आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी दिल्यास अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट रेफरन्स गुणदोषावर निकाली निघेल. सबब, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र. १ विरुध्दचा दिनांक १४/०२/२०१९ रोजीचा रेफरन्स अर्ज विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

PRAVIN MOHAN UNHALE

Digitally signed by PRAVIN MOHAN UNHALE
Date: 2024.09.20 17:31:44 +0530

(**पी. एम. उन्हाळे**)

महाड
दिनांक १९/०९/२०२४

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड